**<u>पी.डब्लु. डी.व्ही.अर्ज क्र.४०/२०२४</u>**

**<u>लक्ष्मी +हर्षल</u>**

<u>(सी.एन.आर क्र. एमएचएएम ०९००२९४५२०२४)</u>

**<u>आदेश निशाणी क्र.१ खाली.</u>**

**(दिनांक १३.०३.२०२६)**

अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ चे कलम २३ नुसार प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्ज दाखल केल्या तारखेपासुन अर्जदाराला गैरअर्जदारांकडुन अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार याची कायदेशीर पत्नी असुन तिचे व गैरअर्जदाराचे पती–पत्नीचे नाते आजही कायम आहेत. अर्जदाराचे लग्न गैरअर्जदारासोबत दिनांक १४.०७.२०२४ रोजी चांदुरबाजार, ता. चांदुर बाजार येथे झाले आहे. अर्जदाराच्या वडिलांनी लग्नामध्ये रुपये १५ लाख एवढा खर्च केला. लग्नानंतर अर्जदार ही तिला लग्नात मिळालेल्या सर्व भेटवस्तु व स्त्रीधनासह गैरअर्जदारासोबत तिच्या सासरी राजू नगर हिंगणा रोड, नागपूर, जि. नागपूर येथे नांदावयास गेली. परंतु लग्नानंतर गैरअर्जदाराने व त्याच्या कुटुंबियांनी अर्जदारास केवळ तीन दिवस चांगली वागणूक दिली व त्यानंतर त्यांनी अर्जदाराला शारिरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. या त्रासामुळे अर्जदार हिचे कौटुंबिक जीवन उध्वस्त झाले आहे. गैरअर्जदार क्रं २ यांनी अर्जदारासी असभ्य वर्तन केले. तसेच गैरअर्जदार क्रे १ ते ३ हे अर्जदाराचा नेहमीच अपमान करित होते. तु भोकन्या डोळयाची आहेस असे म्हणून तिचा अपमान करित होते. तसेच गैरअर्जदार क्रं १ हा तुझे चारित्र्य चांगले नाही असे अर्जदारास म्हणत होता. गैरअर्जदारानी अर्जदारास घरातून बाहेर जाण्यास मनाई केली होती. तसेच तिला फोन करण्यास व नातेवाईकास

भेटण्याससुध्दा मज्जाव केला होता. गैरअर्जदार क्रं १ व २ यांनी अर्जदार यांच्या कानातील ५ ग्राम सोने गहाण करुन पैसे घेतले. अशाप्रकारे, गैरअर्जदारांनी मिळुन अर्जदारचा कौटुंबीक छळ केल्यामुळे तिला तिचे माहेरी रहावे लागत आहे.

**०३**. अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती तिच्या आई वडीलांच्या दयेवर जीवन जगत आहे. तसेच गैरअर्जदारांनी दि ०२.१०.२०२४ पासून तिला कोणताही खर्च दिलेला नाही तसेच तिच्या जेवणाचा, औषधाचा व कपड्यालत्याचा कोणताही खर्च दिलेला नाही. त्याअर्थी गैरअर्जदाराकडे असलेले उत्पन्नाचे स्त्रोत विचारात घेऊन तसेच दैनंदिन जिवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या किंमती गगनाला भिडलेली महागाई व अर्जदाराची उदरनिर्वाहाची तसेच औषधोपचाराची गरज विचारात घेऊन गैरअर्जदार हा अर्जदाराला र.रु. २०,०००/– प्रतिमहिना अंतरिम पोटगी सहज देऊ शकतो.

**०४.** गैरअर्जदारांना नोटीस बजावली. गैरअर्जदारांच्या वतीने सुविद्य विधीज्ञ श्री. आर.डी.वासनकर यांनी प्रस्तुतच्या व मूळ अर्जावर म्हणणे **निशाणी क्र.११** वर दाखल केले. तसेच गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले की, अर्जातील मजकुर चुक व खोटा आहे. परंतु गैरअर्जदाराने अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले आहेत. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, लग्न जुळण्याच्या आधी बैठकीमध्ये गैरअर्जदार याचे शिक्षण केवळ दहावी पर्यंत झाले असल्याचे व त्याचे वडिलांची छोटी चहाची कॅटीन असल्याची माहिती अर्जदार व तिच्या आई वडिलांना देण्यात आली होती. सदरच्या बाबी अर्जदारास मान्य असल्यामुळे तिला लग्नाला समंती दर्शविली होती. लग्नानंतर काही दिवसातच अर्जदारास एपी लेप्सीचा त्रास असल्याचे गैरअर्जदारास लक्षात आले. तिला गैरअर्जदाराच्या आई वडिलांसह एकत्र कुटुंबात राहणे पसंत नव्हते. त्यामुळे ती गैरअर्जदाराला एमपीएससी, युपीएससीची तयारी

करण्यासाठी पुणे येथे चलण्याचा आग्रह करत होती.

०५. गैरअर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हिच्या उदासिन स्वभावामध्ये आणखीणच वाढ होत गेल्याने तिला गैरअर्जदारासोबत नांदण्याची इच्छा नकोशी झाली व त्यातूनच अर्जदार हिने गैरअर्जदार व त्याच्या आईवडिलांवर मानसिक व शारिरिक छळ केल्याचे खोटे आरोप करण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदार हिने गैरअर्जदारांच्या वडिलांची समाजातील प्रतिष्ठा मलिल करण्याचे हेतूने दि. ०५.१०.२०२४ रोजी त्यांच्या विरुध्द घाणेरडे आरोप केले व पोलीस स्टेशन हिंगणा येथे खोटी फिर्याद केली. अर्जदार ही कुठलेही कारण नसताना स्वत: गैरअर्जदाराचे घर सोडून गेली आहे व तिच्या माहेरी राहत आहे. सन २०२५ पासुन अर्जदार ही गैरअर्जदारपासुन वेगळी राहत असुन ती परत येण्याचे गैरअर्जदाराने बरेच प्रयत्न केले परंतु ती परत आली नाही. तसेच, गैरअर्जदाराचे आई वडील म्हातारे असुन त्यांची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदार यांचेवरच आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या वडिलांवर खोटे आरोप केल्यामुळे गैरअर्जदाराचा कॅन्टनिकचा व्यवसाय बंद आहे व तो दुसऱ्याच्या चहाच्या कॅंटिवर रुपये ३०० ते ३५० प्रति दिन प्रमाणे मजूरीचे काम करुन जीवन जगत आहे तसेच त्याच्याकडे राहण्यासाठी स्वत:चे घर नसून तो भाडयाच्या घरात राहत आहे.

०६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारावर घरगुती हिंसाचार झाला हे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ०२. | अर्जदारावर ची गैरअर्जदारांनी सबळ कारणाशिवाय उपेक्षा केली असे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |
| ०३. | अर्जदार गैरअर्जदाराकडून मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | .... अंशतः होकारार्थी. |
| ०४. | आदेश काय ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसाः**

**मुद्दा क्र.१ करिताः–**

**०७.** अर्जदाराच्या वतीने ॲड. श्री. ए. बी. काळे यांनी अर्जातील कथनानुसार युक्तीवाद केला व अर्जदाराला, तिने मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मंजूर करण्याबाबत न्यायालयाला विनंती केली. तसेच, गैरअर्जदारांच्या वतीने ॲड. श्री. आर. डी. वासनकर यांनी युक्तीवाद केला व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०८.** गैरअर्जदारांनी मुख्य व अंतरीम खावटी अर्जाला त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.११ नुसार दाखल केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदाराने असे मान्य केले आहे की, लग्नानंतर अर्जदार त्याच्याकडे राहिली. यावरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र १ यांचे वैवाहीक संबंध असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. गैरअर्जदारांने त्यांच्या उत्तरामध्ये त्यांच्या विरुध्द लावलेल्या सर्व आरोपांचे खंडण केले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सुध्दा तिच्यावर झालेल्या हिंसाचार घटनाक्रमाने नमुद केला आहे. यावरुन अर्जदारावर गैरअर्जदारांकडुन घरगुती हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते.

**०९.** अर्जदार व गैरअर्जदारांनी एकमेकांविरूध्द आरोप प्रत्यारोप केल्याचे दिसुन येते. दोन्ही अर्जदार हे हिंदु धर्माचे आहेत. हिंदु धर्म रितीरिवाजानुसार तसेच समाजात असलेल्या संस्कृतीनुसार कोणतीही विवाहीत स्त्री ही सबळ कारणाशिवाय तिच्या पतीला

सोडुन माहेरी राहत नाही. गैरअर्जदारांकडुन त्यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांचे जरी खंडण करण्यात आले असले तरीही अर्जदाराच्या कथनावर अविश्वास ठेवावा हे सद्सदविवेक बुध्दीला न पटण्यासारखे आहे. अर्जदाराने केलेल्या संपुर्ण कथनांचा एकत्रीत विचार करता गैरअर्जदारांकडुन तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करीता:–</u>**

**१०.** प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदार हिने तिच्या उपजिवीकेकरीता रु. २०,०००/– प्रतिमाह अंतरीम पोटगी मिळण्याचे नमुद केले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार ती तिच्या माहेरी राहत आहे व गैरअर्जदाराने तिच्या पालनपोषनाची कोणतीही व्यवस्था करुन ठेवली नाही.

**११.** अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ हा त्याच्या व्यवसायातून भरपूर उत्पन्न मिळवितो. याठिकाणी हे नमूद करणे गरजेचे आहे की, अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या उत्तरामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदाराला शारीरीक व मानसिक छळ केला नाही व तिच्यावर कोणताही अत्याचार केलेला नाही. तसेच अर्जदाराने प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदाराला त्याप्रमाणे उत्पन्न मिळत नसुन अर्जदाराने काल्पनिकरित्या ते नमुद केले आहे. त्यामुळे काल्पनिक दाखवलेल्या उत्पन्नाच्या आधारावर तिच्या मागणीप्रमाणे पोटगी मंजुर करता येणार नाही.

**१२.** अर्जदाराने व गैरअर्जदाराने अभिलेखावर उत्पन्न व दायीत्व प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. परंतु, ज्याअर्थी अर्जदार ही त्याची पत्नी असुन गैरअर्जदार हा अर्जदाराची जबाबदारी टाळु शकत नाही.

**१३.** गैरअर्जदार क्र. १ हा दुसऱ्याच्या चहाच्या कॅन्टिन वर मजुरीचे काम करुन प्रतिदिन ३००–३५० रुपये कमावतो असे कथन केले आहे. याठिकाणी हे नमूद करणे गरजेचे आहे की, अर्जदाराला फौ.कि.अर्ज क्रं १०७/२०२५ फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १२५ नुसार प्रतिमहा ५,०००/– रुपये पोटगी या अगोदर मंजूर करण्यात आली असून सदरचा आदेशसुध्दा या प्रकरणात ग्राह्य धरणे आवश्यक आहे. जरी गैरअर्जदार हा मजूरी करतो हे कथन खरे असल्याचे जरी गृहीत धरले तरीही अर्जदाराला सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदारांवर आहे. अंतरिम पोटगीचा अर्जाचा निर्णय घेत असतांना प्रथमदर्शनी अर्जदारावर घरगुती हिंसाचार झाला हे अभिलेखावरुन दिसुन येणे गरजेचे आहे. गैरअर्जदारांनी असे कुठेही कथन केले नाही की, त्यांनी अर्जदारांच्या पालन पोषणाची व्यवस्था केली आहे किंवा अर्जदार ही स्वत: तिच्या पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारू शकते किंवा तिच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराला अंतरीम पोटगी देण्याचे दायीत्व हे गैरअर्जदारावर आहे.

**१४.** दोन्ही बाजुंकडील त्यांच्या राहणीमानाचा दर्जा, आजच्या महागाईचा व फौजदारी किरकोळ अर्ज क्रं १०७/२०२५ यामध्ये मंजूर करण्यात आलेल्या अंतरिम पोटीगीचा विचार करता मी या निष्कर्षावर पोहोचतो की, अर्जदार हिला रूपये १,०००/– (अक्षरी एक हजार रुपये) अंतरीम पोटगी मंजुर केल्यास ती योग्य व न्याय्य होईल. तसेच गैरअर्जदारावर सुध्दा अन्यायकारक होणार नाही. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**०१.** अर्जदारांचा अर्ज (नि.क्र.०१) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** गैरअर्जदार क्र. १ ला निर्देश देण्यात येते की त्यांनी, अर्जदार हिला र.रूपये १,०००/– (अक्षरी एक हजार रुपये) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्ज अंतिम निकाली निघेपर्यन्त द्यावी.

**०३.** गैरअर्जदाराना असेही निर्देश देण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला अर्जाच्या खर्चापोटी ५००/– (अक्षरी पाचशे फक्त) द्यावेत.

**०४.** या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना निःशुल्क देण्यात यावी.

**०५.** उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2026.03.14 10:28:14 +0530

दिनांकः– १३.०३.२०२६ **(मंदार मो. राऊत)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
चांदूर बाजार, जि. अमरावती.